# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक २८/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२४) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक २८/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२४) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:०५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त(महसुल), नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०७. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०८. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०९. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१०. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
११. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१२. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : कॉग्रेसचे जेष्ठ नेते व राजकीय क्षेत्रातील नामवंत व्यक्तीमत्व असणारे श्री.सुरेश पाटील यांचे दुखःद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.
(श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला त्यास श्रीमती.शिल्पाराणी वाडकर, स.सत्यभामा शिंदे यांनी अनुमोदन दिले.)

मा.सभापती : ठिक आहे, सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.
(यावेळी स्व.सुरेश पाटील यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : पुलवामामधील हल्ल्यामध्ये शहिद झालेल्या जवानांचा हवाई दल सेनेकडुन बदला घेण्यात आला. सभागृहातर्फे हवाई दलातील जवानांचे अभिनंदन करण्यात यावे.

मा.सभापती : पुलवामामधील जवानांवर केलेल्या हल्ल्याचा भारतीय सैन्यांनी सुड घेतल्या बद्दल हवाई दलातील सैनिक आणि इतर सर्व प्रमुखाचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेतर्फे कनिष्ठ अभियंता या पदाची भरती कशा पध्दतीने घेतली आहे? याचा खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (महसुल) : दि.२४.०२.०१९ रोजी कनिष्ठ अभियंता या पदाची भरती करण्यात आली. एकुण अकरा पदाकरिता परिक्षा घेण्यात आली होती. परिक्षा झाल्या नंतर त्याच दिवशी निकाल जाहीर केला आहे.

श्री.गजानन बारवाल : यावर माझा अक्षेप आहे, जी परिक्षा घेण्यात आली आहे ती अतिशय चुकीच्या पध्दतीने झाली आहे. तिथे योग्य प्रकारचे नियोजन केलेले नव्हते. एका बेंच वर तीन-तीन विद्यार्थी बसुन पेपर देत होते. मोठ्या प्रमाणात महापालिकेमध्ये रिक्त पदे असतांना या आकरा जागेसाठी एकाच दिवसात सगळे काही करायचे कसे ठरवले? उर्वरित रिक्त पदे का भरली जात नाही.

मा.सभापती : भरती करण्याकरिता नियोजन काय काय केले त्याची माहिती द्यावी.

उपआयुक्त (महसुल) : देवगिरी महाविद्यालयामध्ये परिक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थींसाठी बसण्याची व्यवस्था केलेली होती. वेळेवर परिक्षा सुरु केली होती, एका-एका हॉलमध्ये दोन सुपरव्हायझर होते.

श्री.गजानन बारवाल : एका बेंच वर तीन-तीन विद्यार्थी बसुन पेपर देत होते, हे चुकीचे असेल तर त्यांची निवड का करण्यात आली?

उपआयुक्त (महसुल) : ज्या हॉलमध्ये विद्यार्थी संख्या जास्त होती तेथील विद्यार्थ्यांना वेग-वेगळ्या हॉलमध्ये बसण्याची व्यवस्था केली होती.

श्री.गजानन बारवाल : अनेक जण इच्छुक असल्यावर सुध्दा त्यांना परिक्षा देता आलेली नाही. विद्यार्थी परीक्षा न देता परत निघुन गेले होते.

मा.सभापती : किती विद्यार्थी आले होते, सगळ्यांनी परिक्षा दिली का? सर्व मुद्देसुद माहिती द्यावी.

उपआयुक्त (महसुल) : जेवढे विद्यार्थी आले होते त्या सर्व विद्यार्थ्यांनी परिक्षा दिलेली आहे.

श्री.गजानन बारवाल : अतिशय चुकीच्या पध्दतीने परिक्षा झाली आहे. प्रश्नपत्रिकेमध्ये विचारलेले प्रश्न सुध्दा वेगळ्या पध्दतीचे होते. यामध्ये माझा स्पष्ट आरोप आहे. झालेली भरती ही रद्द करण्यात यावी. नव्याने भरती करावी.

मा.सभापती : श्री.पानझडे यांनी स.सदस्याचे जे आरोप आहेत ते नोंद करुन घेण्यात यावे आणि मा.आयुक्तांना द्यावे.

श्री.गजानन बारवाल : अनेक आरोप या आधी सुध्दा केलेले आहे. मा.आयुक्तांनी माहिती द्यायला पाहिजे होती. सभेमध्ये मा.आयुक्तांनी यायला पाहिजे आमच्या प्रश्नाचे उत्तर देणे अपेक्षीत असते.

मा.सभापती : त्यांना लेखी पत्र दिलेले आहे. तीन दिवसा अगोदर विषयपत्रिका दिलेली आहे. मा.आयुक्तांनी सभेमध्ये येणे अपेक्षित होते.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा होत नाही. अधिकारी गैरहजर असतात. मा.आयुक्त सभेमध्ये आले तर काही प्रश्न मार्गी लागतील.

मा.सभापती : मा.आयुक्तांना फोन लावण्यात यावा ते येणार नसतील तर त्यांचे प्रतिनिधी कोण आहेत त्यांना बोलवण्यात यावे. तो पर्यंत इतर चर्चा करण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : १ सप्टेंबर पासुन अभय योजना सुरु केली. किती होर्डिंग अधिकृत केले? दंड किती वसुल झाली? त्याची माहिती मागितली होती. या व्यतिरिक्त दुसरीच माहिती देण्यात आली आहे. तीन-चार मिटींग पासुन प्रश्न विचारुन सुध्दा प्रशासनाचे यावर उत्तर मिळत नाही.

श्री.गजानन बारवाल : गारखेडा येथील महेशनगरमध्ये नुपूर अपार्टमेंन्टमधील हॉल श्री.सिध्दांत साबळे या व्यक्तीने जिम साठी सहा महिन्यापासुन वापर करत आहे. ती जागा आरोग्य विभागासाठी मालमत्ता विभागाने दिलेली आहे.

मा.सभापती : नुपूर अर्पाटमेंन्टमध्ये महापालिकेचा हॉल आहे. तिथे जिम चालु आहे. अतिक्रमणाच्या लोकांना सांगुन ते तातडीने खाली करावे.

श्रीमती.सायरा बानो : चेलीपुरा वार्डामध्ये ३२ अतिक्रमण झाले. माझ्या घराजवळ सुध्दा अतिक्रमण झाले आहे. सुचना देऊन ही कार्यवाही होत नाही.

मा.सभापती : नगरसेवकांच्या घरासमोर अतिक्रमण झाले आहे. वारंवार सांगुन का काढले जात नाही?

कार्य अभियंता(अति) :अतिक्रमण विषयी यापुर्वी सुचना दिलेल्या आहेत. दोन दिवसात कारवाई करणार आहोत.

श्रीमती.सत्यभामा शिंदे :चार महिन्यापासुन वार्डामध्ये चाळीस ते पन्नास टक्के लाईट बंद आहे. चार दिवसापासुनफोन करते आहे. उडवा उडवीचे उत्तरे दिली जाते.

मा.सभापती : लाईटच्या मेंन्टेनन्सचा प्रॉब्लेम पुर्ण शहराचा आहे. काम का होत नाही खुलासा करावा.

उपअभियंता(श्री.खमर) : २१ भागामध्ये आकरा कंत्राटदार नियुक्त केले होते. सन २०१५ पासुन ते काम करत होते. सर्वसाधारण सभेने त्यांना वेळो वेळी मुदत वाढ दिलेली आहे. ३१ डिसेंबरला मुदत संपल्यानंतर त्यांना काम करण्यासाठी विनंती केली. परंतु त्यांनी पत्र दिले की, आम्ही काम करण्यास तयार नाही. पुर्ण शहरामध्ये नागरीकांचा आक्रोश होऊ नये म्हणुन प्रशासनाने पुर्ण तयारी करुन प्रत्येक झोन वाईज अंदाजपत्रक तयार केले आहे. मंजुरी घेऊन निविदा काढल्या होत्या. चार वेळेस निविदा काढुन सुध्दा त्यांनी टेंडर भरलेले नाही. त्यांचे मागच्या वर्ष भराचे सहा कोटीचे पेमेंट अकाऊंट विभागामध्ये थकीत आहे. ते पेमेंट देण्यात यावे

अशी त्यांनी विनंती केली. पाच तारखेला निविदा फायनल होणार आहे आणि सात तारखेला काम चालु करणार आहोत.

मा.सभापती : ताबडतोबीने काम सुरु करण्यात यावे.
आज पहिल्यांदाच मा.महापौर आणि सभागृहनेते स्थायी समितीच्या सभेमध्ये आल्या बद्दल त्याचे स्वागत करण्यात येते. श्री.वसंत निकम यांचा आज महापालिकेतील सेवेचा शेवटचा दिवस आहे. ते आज सेवा निवृत्त होत आहे. अतिशय चांगल्या पध्दतीने त्यांनी कामे केली आहेत. अनेक वेळा कामाच्या निमित्ताने त्यांना बोललो असेल तर ते त्या कामा पुरते मर्यादित होते. त्यांच्या उर्वरित आयुष्यामध्ये प्रत्येक क्षण सुखाचा यावा अशी सर्वांच्या वतीने प्रार्थना करतो.
(यावेळी श्री.वसंत निकम हे निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सभागृहनेते, मा.महापौर आणि स.सदस्य श्री.गजानन बारवाल, श्रीमती.शिल्पाराणी वाडकर, सत्यभामा शिंदे, सायरा बानो यांनी शुभेच्छा दिल्या.)
(सभागृहाच्या वतीने मा.महापौर, सभागृहनेते आणि मा.सभापती यांच्या हस्ते श्री.वसंत निकम यांना पुष्पगुच्छ देऊन व त्यांनी चांगली सेवा केल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.)

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : एलईडीच्या संदर्भामध्ये जुनी लाईट बंद आहेत. त्याचे मेंन्टेंन्स होत नाही आणि एलईडीच्या फिटींग उपलब्ध नाही. यावर उपाय काय आहे.

उपअभियंता(श्री.खमर) : प्रशासनातर्फे यावर जे टेंडर काढले आहे त्याचा अहवाल जो सादर करत होतो त्यात टेंडरची शेवटची तारीख ५ मार्च आहे. ते उघडल्यानंतर सहा तारखेला त्यांना वर्कऑर्डर देऊन काम चालु करु. एलईडीच्या प्रकल्पाबाबत कंपनी सोबत जो ४० हजार लाईट लावण्याचा करार केलेला आहे त्यांनी २३ हजार दिवे लावलेले आहेत. आणि त्यांना बंद दिवे चालु करण्यासाठी सुचना दिलेली आहे, कंपनी प्रयत्न करत आहे. स्वतः मी कंपनीचे मुख्य प्रतिनिधी कार्य.अभियंता यांना नोटीस दिली त्यांना समजवुन सांगितले आणि कुठल्याही परिस्थितीत एका आठवड्यामध्ये पुर्ण दिवे चालु व्हायला पाहिजे अशी सुचना केलेली आहे.

मा.सभापती : एक आठवड्यामध्ये काम पुर्ण नाही झाले तर योग्य कारवाई करावी.

उपअभियंता(श्री.खमर) : सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन दंड लावण्याची कारवाई करु शकतो.

श्री.ऋषिकेश खैरे : प्रमुख रस्त्यावर लाईट लावण्याचा निर्णय झाला होता. रस्त्यावर ५० व्हॅटचे, ३० व्हॅटचे लाईट लावले याचा खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता(श्री.खमर) : रस्त्याची रुंदी जर जास्त असेल तर जास्त व्हॅटचे येईल आणि रुंदी जर कमी असेल तर कमी व्हॅटचे येईल. निविदा मध्ये जे टेंडर झाले आहे ते वाचुन दाखवतो. यामध्ये ७५ व्हॅट्चे ८ हजार, ५० व्हॅटचे ११ हजार, ३१ व्हॅटचे ८२०० आणि बाकीचे शंभर व्हॅटचे १००० फिटींग्स् आहेत.

मा.सभापती : सदस्यांच्या वार्डात मुख्य रस्ते आहे. तिथे ५० व्हॅटच्या फिटिंग आधीच लावण्यात आले आहे. मेंन्टेंन्ससाठी रिप्लेस करतांना ३० व्हॅटच्या फिटिंग लावतात असे सदस्यांचे म्हणणे आहे. असा प्रकार होऊ नये.

उपअभियंता(श्री.खमर) : स.सदस्यांनी जी सुचना केली आहे त्याची नोंद घेतो. आणि संबंधीतांना अवगत करतो.

श्रीमती.राखी देसरडा : शहरामध्ये एलईडी लाईट बदलण्याचे काम चालु आहे. सदरील काम सर्वसाधारण सभेने रद्द केल्यानंतर ही ठेकेदार व प्रशासन काम करत आहे. कामाची वर्क ऑर्डर करत असतांना कोणत्या पोलची फिटींग, एलईडी कसे बसवायचे हे ठेकेदारांना माहित नाही. ११५ वार्डाच्या मेंन्टेंन्स कर निविदा निघालेली आहे. आता पर्यंत एकही वार्डात पुर्ण काम झालेले नाही. दर महिन्याला ठेकेदाराला २ कोटी ७२ हजार रु. देतो. आज पर्यंत त्यांना दहा कोटी रु. दिलेले आहे. तरी सुध्दा नेहमी नेहमी असे प्रॉब्लेम का येतात?

उपअभियंता(श्री.खमर) : वृत्तपत्रामध्ये ११५ वार्डच्या नऊ निविदा काढलेल्या आहेत. याचा अंतिम दि.०५ मार्च पर्यंत भरायचे आहे. सात तारखेपासुन काम चालु करणार आहे. आणि बंद दिवे चालु करण्यासाठी कंपनीला आठ दिवसाची मुदत दिलेली आहे.

श्रीमती.शेख नरगीस : कटकट गेट नेहरुनगर, केजीएन हॉस्पिटल मध्ये मेडिकल कॅम्प घेण्यात आला होता. चौकशी केल्यावर माहिती पडले की,तिथे स्टेशनरी नाही,मशिनरी नाही,इतर कोणतेही साहित्य तिथे उपलब्ध नाही. एक वर्षापासुन यावर बोलत आहे, काही उपाय निघणार आहे की नाही?

मा.सभापती : आजच्या आज तिथे जाऊन व्हिजीट द्या आणि जे काही अडचण असेल ते बघावे.

श्रीमती.शेख नरगीस : एक महिन्यापासुन स्टाफसाठी सुध्दा बोलत आहे, त्याचे काय झाले?

आरोग्य वै अधिकारी : फाईल मा.आयुक्तांकडे पाठवलेले आहे.

श्री.सिध्दांत शिरसाट : सातारा मध्ये हॉस्पिटलसाठी जी जागा उपलब्ध करायची होती त्याचे काय झाले?

आरोग्य वै अधिकारी : ती मनपाची जागा नाही तरी पण भाडेतत्वावर घेण्यासाठी दोन प्रस्ताव आलेले आहे. याची संचिका मालमत्ता विभागाकडे सादर झालेली आहे. ते झाल्यावर भाड्यावर इमारत घेऊन हॉस्पिटल शिप्ट करणार आहोत.

श्रीमती.सायरा बानो : वर्षाभरापासुन अंतर जिल्हा बदलीच्या बाबतीत बोलत आहे. याचे अजुन सुध्दा उत्तर देण्यात आले नाही.

शिक्षणाधिकारी : अंतर जिल्हा बदलीच्या बाबतीत जागा आहेत. यामध्ये सिनियरिटी लावलेली आहे. धोरण निश्चित करण्याच्या बाबतीत अतिरिक्त आयुक्त साहेबांनी मिळुन जबाबदारी घेतलेली आहे. अति.आयुक्त नसल्यामुळे ते राहिले आहे. राज्य शासनाकडे जी नियुक्ती आहे ते कळवलेली आहे. अंतर जिल्हा बदलीची कार्यवाही लवकरात लवकर करणार आहोत.

मा.सभापती : आज मा.आयुक्तांना भेटुन काय निर्णय करायचा तो करावा.

श्रीमती.राखी देसरडा : आकाशवाणी चौकामध्ये एका इमारतीवर इलेक्ट्रॉनिक्स जाहीरात स्क्रीन लावलेली आहे. चौकामध्ये सिंग्नल असल्यामुळे लोक तिथे थांबतात. त्या एलईडी स्क्रिनवर अश्लिश प्रकारची लेडिज वेअर आणि जेन्ट्स वेअर ची ॲड दाखवली जाते. लोक आपल्या परिवारासोबत तेथुन जात असतात. लोकांची नजर त्या ॲडकडे जात असते. आजच्या आज स्क्रिनवरील ॲड हटवण्याचे सांगावे.

मा.सभापती : स्क्रिन कोणाची आहे ते बघुन तातडीने ती ॲड बंद करण्यात यावी.

श्री.अब्दुल नविद : पुर्ण शहरामध्ये कुत्र्यांची संख्या वाढली. यावर उपाय केला पाहिजे.

मा.सभापती : श्री.डी.पी. कुलकर्णी याबाबत त्यांना सुचना करण्यात यावी.

**<u>विषय क्र. २४० :</u>**

दिनांक २४/०१/२०१९ रोजी (का.प.क्र.२०) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्र.२४०,२४१,२४२, २४३ मंजुर करण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

दिनांक २४/०१/२०१९ रोजी (का.प.क्र.२०) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. २४१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी अंतर्गत जे.एन.ई.सी. कॉलेज ते बजरंग चौक रस्त्याच्या कडेला पेव्हरब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१८-२०१९ च्या एस.एस.आर. नुसार रक्कम रू.४९,२२,६२९/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा मधुन प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक २४/०१/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी अंतर्गत जे.एन.ई.सी. कॉलेज ते बजरंग चौक रस्त्याच्या कडेला पेव्हरब्लॉक बसविणे या कामाचे र.रू.४९,२२,६२९/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी अंतर्गत जे.एन.ई.सी. कॉलेज ते बजरंग चौक रस्त्याच्या कडेला पेव्हरब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४९,२२,६२९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.१०९ देवानगरी ते निवास कॉलनीकडे जाणाऱ्या नाल्यावरील पुलाची उंची वाढविणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१७-२०१८ नुसार रक्कम रू.३९,३२,३१२/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.२४/०१/२०१९ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ मधील लेखाशिर्ष-नविन कॉंक्रीट रस्ते अंतर्गत पृष्ठ क्र.झोन-८ एस.सी.आर.-पा.क्र.३४ वर अ.क्र.१३ वर रूपये ४०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.३९,३२,३१२/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१०९ देवानगरी ते निवास कॉलनीकडे जाणाऱ्या नाल्यावरील पुलाची उंची वाढविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३९,३२,३१२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३ :**

विषय : झोन क्र.३ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच १२.७० टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२८,११,५१६/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-388074-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | झोन क्र.३ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे बाबत. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणक पत्रक र.रू.२४,९४,६९०/- मान्य झाले आहे. (मा.आयुक्त महोदय यांची मान्यता) |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रू.२४,९४,६९०/- चे |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०७/०१/२०१९ दुपारी ५.०० वा.पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०९/०१/२०१९ दुपारी १०.०० स.वा. पर्यंत |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | पहिली वेळेस |
| ७ | एकूण किती टेंडर्स/निविदा आली? | ३ (तिन) |
| ८ | निविदा प्राप्त दर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.०० टक्के जास्त दराने |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.नुर कन्स्ट्रक्शन,(नागसेन कॉलनी, औरंगाबाद) | २४,९४,६९०/- | १२.७० टक्के जास्त दराने (दर वाटाघाटीअंती) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>होय,<br>बाजारभाव वाढले असल्याने |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | देखभाल दुरूस्ती (पाणी पुरवठा)<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेकडून १२.७० टक्के जास्त दराने (मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दर वाटाघाटी मान्यतेनुसार) म्हणजेच टेंडर रक्कम रू.२८,११,५१६/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.३ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे करीता प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.७० टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२८,११,५१६/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. २४४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७६ विष्णुनगर अंतर्गत श्री.भोजवानी यांचे घरापासून ते श्री.गंगवाल यांचे घराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक (स्टेट शेड्युल रेट वर्ष-२०१८-२०१९) नुसार रक्कम रू.२९,९५,२५०/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्र.एससीआर-झोन-०९ पा.क्र.३८ अ.क्र.१४ वर रक्कम रू.३०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.२९,९५,२५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्र.२४४ ते २५४ पर्यंत मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७६ विष्णुनगर अंतर्गत श्री.भोजवानी यांचे घरापासून ते श्री.गंगवाल यांचे घराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२९,९५,२५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७६ विष्णुनगर अंतर्गत ऑईस्टर शाळा ते सिंधु भवन पर्यंतच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक (स्टेट शेड्युल रेट वर्ष-२०१८-२०१९) नुसार रक्कम रू.३९,९८,६३६/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्र.एससीआर-झोन-०९ पा.क्र.३८ अ.क्र.१५ वर रक्कम रू.४०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.३९,९८,६३६/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७६ विष्णुनगर अंतर्गत ऑईस्टर शाळा ते सिंधु भवन पर्यंतच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३९,९८,६३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.१०३, अंतर्गत आय.टी.आय. कॉलेज ते चक्रपानी कॉलनी या रस्त्याचे काँक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक एसएसआर-२०१८-१९ नुसार रक्कम रू.४९,९६,३१०/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील नविन काँक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.४९,९६,३१०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०३, अंतर्गत आय.टी.आय. कॉलेज ते चक्रपानी कॉलनी या रस्त्याचे काँक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४९,९६,३१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२५ अंतर्गत व्ही.आय.पी. रोड पासून ते नॅशनल शाळा ते मनपा शाळे पर्यंत काँक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१८-१९ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.४९,९६,२१५/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील वार्ड क्र.०३-जीबीआर-पान क्र.२९, अ.क्र.८ वर रक्कम रूपये ५०.०० लक्ष तरतूद उपलब्ध नविन काँक्रीट रस्ते या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या ५०.०० लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात रस्त्याचे मजबुतीकरण करून काँक्रीटींग करणे ह्या कामाचे समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.४९,९६,२१५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२५ अंतर्गत व्ही.आय.पी. रोड पासून ते नॅशनल शाळा ते मनपा शाळे पर्यंत काँक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४९,९६,२१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जायकवाडी उद्भव ते नक्षत्रवाडी दरम्यान ७०० मीमी व्यासाची शुध्द व अशुध्द उद्वरण वाहीनी आहे. सदरील जलवाहीनी सन १९७५-७६ साली टाकण्यात आलेली असून या जलवाहीनीवर ७०० मीमी व्यासाचे सेक्शनिंग व्हॉल्व, ३०० मीमी व्यासाचे स्कावर व्हॉल्व व १५० मीमी व्यासाचे कायनेटीक एअर व्हॉल्व जलवाहीनी कार्यान्वीत करतांना बसविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत या झडपांपैकी बहुतांश सेक्शनिंग झडपा या नादुरूस्त झालेल्या आहेत. यामुळे देखभाल दुरूस्तीच्या कामात अडचण निर्माण होवून छोट्या कामाकरीता सुध्दा जास्त लांबीमध्ये जलवाहीनीतील पाण्याचा निचरा करून काम करावे लागते. यामुळे कामास विलंब होतो. त्याचप्रमाणे पाणी व्यय देखील जास्त होवून जलवाहीनी पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी विलंब लागतो. सदरील जलवाहीनीवर टाकण्यात आलेले ३०० मीमी व्यासाचे स्कावर व्हॉल्व टाकून सुमारे ४३ वर्ष झालेली असल्याने काळाच्या ओघात स्कावर व्हॉल्व हे जमीनीखाली गेलेले असल्याने या व्हॉल्व मधून परिणामकारकरित्या पाण्याचा निचरा होत नाही. करीता नैसर्गिकरित्या पाण्याचा निचरा होणाऱ्या जागेवरती नव्याने स्कावर व्हॉल्व टाकणे गरजेचे आहे. अशीच स्थिती १५० मीमी व्यासाच्या एअर व्हॉल्वची देखील असून आयुर्मान झालेले असल्याने एअर व्हॉल्व बदलणे गरजेचे आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ व सा.बां. बांधकाम विभागाच्या सन २०१७-१८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.३६,४६,५६३/- इतकी आहे. सदरील काम जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आलेले आहे. करीता अंदाजपत्रक र.रू.३६,४६,५६३/- चे मा.स्थायी समिती सभेसमोर अवलोकनार्थ तसेच मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जायकवाडी उद्‌भव ते नक्षत्रवाडी दरम्यान असलेल्या ७०० मीमी व्यासाची शुध्द व अशुध्द उद्वरण वाहीनीवरील सेक्शनिंग व्हॉल्व, ३०० मीमी व्यासाचे स्कावर व्हॉल्व व १५० मीमी व्यासाचे कायनेटीक एअर व्हॉल्व बदलणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३६,४६,५६३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९ :**

विषय : वार्ड क्र.९ मयुरनगर, सुदर्शननगर अंतर्गत एन-११/ए सेक्टर येथे १००,१५०,२०० व २५० मीमी व्यासाची डीआय जलवाहीनी टाकणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच २२.६९ टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.३०,५७,८४५/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-315237-6

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.९ मयुरनगर, सुदर्शननगर अंतर्गत एन-११/ए सेक्टर येथे १००,१५०,२०० व २५० मीमी व्यासाची डीआय जलवाहीनी टाकणे बाबत. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणक पत्रक र.रू.३०,५७,८४५/- मान्य झाले आहे. (मा.आयुक्त महोदय यांची मान्यता) |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रू.२४,९२,३३४/- चे |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०८/०८/२०१७ दुपारी ५.०० वा.पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १०/०८/२०१७ दुपारी ११.४१ वा.पर्यंत |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | ६ वेळेस |
| ७ | एकूण किती टेंडर्स/निविदा आली? | १ (एक) |
| ८ | निविदा प्राप्त दर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.०० टक्के जास्त दराने |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.नुर कन्स्ट्रक्शन, (नागसेन कॉलनी, औरंगाबाद) | २४,९२,३३४/- | २२.६९ टक्के जास्त दराने (दर वाटाघाटीअंती) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>नाही,<br>नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | भांडवली कामे पाणी पुरवठा<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेकडून २२.६९ टक्के जास्त दराने (मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दर वाटाघाटी मान्यतेनुसार) म्हणजेच टेंडर रक्कम रू.३०,५७,८४५/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९ मयुरनगर, सुदर्शननगर अंतर्गत एन-११/ए सेक्टर येथे १००,१५०,२०० व २५० मीमी व्यासाची डीआय जलवाहीनी टाकणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.६९ टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.३०,५७,८४५/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.११५ अंतर्गत कमलनयन बजाज हॉस्पीटल बीड बायपास ते सुधाकरनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाची बी-२ स्वरूपाची निविदा असून कामाचे एल-१ निविदाधारक व्ही.बी.ए. इन्फ्रा इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर यांचेकडून प्राप्त बाब निहाय दराची रक्कम रू.१,६९,४८,७१९/- इतकी असून याची नवीन चालू वर्षाच्या दरांशी तुलना केली असता, दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८८ टक्के इतकी कमी येत आहे. सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा निर्णयास्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणेस्तव सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.AMCA-305835-१ सन-२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ महानगरपालिका औरंगाबाद |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.११५ अंतर्गत कमलनयन बजाज हॉस्पीटल बीड बायपास ते सुधाकरनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | रू.२,१२,१७,७२५/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | --- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०७/०४/२०१८ ते ०२/०५/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २७/१२/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | सहा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | व्ही.बी.ए.इन्फ्रा इंजिनियर्स ॲण्ड कॉंट्रॅक्टर | १६९४८७१९.०० | एल-१ |
| ०२. | व्ही.टी.पाटील इंजिनियर्स ॲण्ड कॉंट्रॅक्टर | १७३०६५०६.०० | एल-२ |
| ०३. | मोहम्मद अहेमद सिद्दीकी | १७३४७३६३.०० | एल-३ |
| ०४. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | १७६०५५९५.८० | एल-४ |
| ०५. | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | १८६२६११३.५० | एल-५ |
| ०६. | राजेंद्रसिंग अजीतसिंग गुरूदत्ते | १९९८७३२६.५५ | एल-६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | --- |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विविध विकास कामे व मुलभुत सुविध पुरविणे सातारा/देवळाई |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |

| | | |
|---|---|---|
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयांकित प्रकरणी एल-१ निविदाधारक व्ही.बी.ए. इन्फ्रा इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून प्राप्त बाबनिहाय दराची रक्कम रू.१,६९,४८,७१९/- इतकी असून याची नवीन चालू वर्षाच्या दरांशी तुलना केली असता, दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८८ टक्के इतकी कमी येत आहे. सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवणेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११५ अंतर्गत कमलनयन बजाज हॉस्पीटल बीड बायपास ते सुधाकरनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे एल-१ निविदाधारक व्ही.बी.ए. इन्फ्रा इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८८ टक्के कमी दराने म्हणजेच रक्कम रू.१,६९,४८,७१९/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१ :**

विषय : वार्ड क्र.७१ अंतर्गत गुरूतेग बहादुर शाळा ते पप्पु गॅरेज पर्यंत व इतर रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे ठेकेदार मे.व्ही.बी. इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.६६ टक्के कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.३७,२९,३०५/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.२१/०६/२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ३९,९५,३४०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३९,९५,३४०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १८ जुन २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २१ जुन २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०२ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.व्ही.बी.ए. इन्फ्रा | ३७,२९,३०५/- | अं.प. दरापेक्षा ६.६६ टक्के कमी दराने |
| ०२. | मे.नाज डेव्हलपर्स | ३९,५५,४४५/- | अं.प. दरापेक्षा १.०० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | --- |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.२१/०३/२०१८ विषय क्र.३३१ |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.व्ही.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.६६ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.३७,२९,३०५/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७१ अंतर्गत गुरूतेग बहादुर शाळा ते पप्पु गॅरेज पर्यंत व इतर रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.व्ही.बी.इन्फ्रा यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.६६ टक्के कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.३७,२९,३०५/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असून या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज १५० दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅसचा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. अशुध्द पाण्यात गढुळतेचे प्रमाण जास्त असते. पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी प्रामुख्याने तुरटी ग्रेड-१ चा वापर केला जातो. जायकवाडी उद्भवावरून येणाऱ्या पाण्यात गढुळतेचे प्रमाण कमी असते, तथापी सरासरी १० पी पी एम इतकी तुरटी मात्रा वर्षभर द्यावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात धरणात नवीन पाण्याची आवक वाढल्यानंतर पाण्याच्या गढुळतेत प्रचंड वाढ होते. त्यावेळेस तुरटीची मात्रा वाढवावी लागते. या सर्व बाबींचा विचार करता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची वार्षिक मागणी ही ९१० मे टन इतकी आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन २०१६-१७ च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्याच्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.७७,३५,०००/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.५३२ दि.११/०७/२०१८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता, निविदा कार्यवाहीचा तपशिल खालीलप्रमाणे.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-338194-8

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, रू.७७,३५,०००/- मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.५३२ दि.११/०७/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रू.७७,३५,०००/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची अंतीम मुदत | २२/११/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २६/११/२०१८ |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | आठ वेळेस |
| ७ | एकूण किती टेंडर्स/निविदा आली? | एक |
| ८ | निविदा प्राप्त दर | रू.१०८०० मे.टन (अं.प.दरापेक्षा २७.०५ टक्के जास्त दराने) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | सार्क केमिकल्स, औरंगाबाद | ९८,२८,०००/- | २७.०५ टक्के जास्त |

दर पृथःकरण व वाटाघाटीअंती सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांनी रू.१०,८०० प्रति मे.टन ऐवजी रू.९९२५ प्रति मे टन अशा दरास सहमती दिली आहे. (१६.७६ टक्के जास्त)

| | | |
|---|---|---|
| ९ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>होय, जीएसटी कर, मजिप्रा मंडळाची सन २०१६-१७ ची दरसुची ज्यात वाहतुक खर्चाचा समावेश नाही. |

| | | |
|---|---|---|
| १० | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | पाणी पुरवठा रसायन सामग्री खरेदी सन २०१८-१९<br><br>अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्तीचा खर्च उपरोक्त लेखा शिर्षकात असलेल्या एकत्रित तरतुदीमधुन केला जाईल. |
| ११ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| १२ | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी विषयांकित काम सार्क केमिकल्स्, औरंगाबाद यांचेकडून वाटाघाटीअंती मान्यतेनुसार रू.९९२५/- प्रति मे.टन या दराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.७६ टक्के जास्त दराने रक्कम रू.९०,३१,७५०/- करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारक सार्क केमिकल्स्, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीताकडून रू.९९२५/- प्रति मे.टन या दराने व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.७६ टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.९०,३१,७५०/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २५३ :</u>**

विषय : वार्ड क्र.६५ विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत श्री.जाधव यांच्या घरासमोरील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे, या कामाचे ठेकेदार मे.संतोष रूपचंद चव्हाण यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०१ टक्का कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये २९,५१,२४८/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-२०१७-AMCA-252580-१ सन-२०१७-२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.६५ विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत श्री.जाधव यांच्या घरासमोरील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती मान्यता ठराव क्र.९४ दि.१३/०९/१७ र.रू.२८,८१,१००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | २९,८१,०५९.४६ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई-टेंडर |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २०/०२/२०१७ ते २४/११/२०१७ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २४/११/२०१७ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | संतोष रूपचंद चव्हाण | २९,८१,०५९.४६ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०१ टक्का कमी |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
